# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:10.10.2025** **वार:शुक्रवार**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्यात मुंबईत द्विपक्षीय चर्चा; दोन्ही नेत्यांचा ग्लोबल फिनटेक परिषदेतही सहभाग
2. डिजिटल क्रांतीद्वारे भारताची जागतिक महासत्तेकडे वाटचाल सुरू असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन;
3. राज्यातल्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकांची प्रारूप मतदार यादी जाहीर
4. दहशतवाद विरोधी पथकाचे पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये छापे आणि
5. भारत आणि वेस्टइंडीज दरम्यान दुसरी क्रिकेट कसोटी आजपासून दिल्लीत

**मोदी-स्टार्मर**

भारत आणि ब्रिटन दरम्यानची वाढती भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार ठरली आहे. या भागीदारीमुळे दोन्ही देशांत व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी निर्माण झाल्या आहेत, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मुंबईत केलं. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर हे दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. पंतप्रधान मोदी आणि स्टार्मर यांच्यामध्ये काल झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर मोदी आणि स्टार्मर यांनी संयुक्त निवेदन जारी केलं.

भारत मुक्त व्यापार कराराच्या माध्यमातून दोन्ही देशांत विविध क्षेत्रातल्या सहयोगाच्या संधी उपलब्ध झाल्याचा उल्लेख मोदी यांनी केला. ते म्हणाले....

**प्राइम मिनिस्टर स्टामर के नेतृत्व में भारत और यूके के रिश्तों में उल्लेखनीय प्रगति हुई है। इस साल जुलाई में मेरी यूके यात्रा के दौरान हमने ऐतिहासिक कॉम्प्रिहेंसिव इकोनॉमिक एंड ट्रेड एग्रीमेंट सीटा पर सहमति बनाई। इस समझौते से दोनों देशों के इंपोर्ट कॉस्ट में कमी आएगी। युवाओं के लिए रोजगार के नए अवसर बनेंगे, व्यापार बढ़ेगा और इसका लाभ हमारे उद्योग तथा उपभोक्ता दोनों को ही मिलेगा।**

भारत आणि ब्रिटन यांच्यातील मानवी बंध हेच या नात्याचे खरे वैशिष्ट्य आहे असं स्टार्मर म्हणाले. 2028 पर्यंत जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याचं उद्दिष्ट आणि विकसित भारत 2047 या दृष्टिकोनाबद्दल मी पंतप्रधान मोदी यांचं अभिनंदन करतो. या प्रवासात आम्ही भारताचे भागीदार व्हावे, ही आमची इच्छा आहे, असंही स्टार्मर यांनी यावेळी सांगितलं.

**फिनटेक**

मुंबईत सुरु असलेल्या ग्लोबल फिनटेक महोत्सवामध्येही पंतप्रधान मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान स्टार्मर सहभागी झाले. डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून भारत आत्मनिर्भरतेकडून जागतिक महासत्तेकडे वाटचाल करत आहे, या प्रवासात ब्रिटनची भूमिका महत्वाची ठरणार आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं. भारताने डिजिटल तंत्रज्ञानाचं लोकशाहीकरण केलं; प्रत्येक नागरिकासाठी आणि देशातील प्रत्येक प्रदेशासाठी ते सहज उपलब्ध आहे, असं मोदी म्हणाले. जागतिक गुंतवणूकदारांना भारताच्या जागतिक महासत्तेच्या वाटचालीत सहभागी होण्याचं आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केलं.

दरम्यान ग्लोबल फीनटेकमध्ये काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत झाली. राज्याच्या सर्व प्रकल्पांच्या अंमलबजावणीत 'स्पष्ट दृष्टिकोन, जलद निर्णयप्रक्रिया आणि जबाबदार अंमलबजावणी' हे तीन महत्त्वपूर्ण स्तंभ आहेत, असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. 'इन्फ्रास्ट्रक्चर वॉर रूम'च्या माध्यमातून निर्णयप्रक्रिया गतिमान करण्यात आली असल्याचं ते म्हणाले.

**मतदार यादी**

राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपरिषदा तसंच नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रारूप मतदार यादी 8 ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आली आहे. या यादीतील नावे mahasecvoterlist.in या संकेतस्थळावर शोधण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तहसील, नगर परिषद आणि नगरपंचायतीच्या कार्यालयातही ही यादी उपलब्ध आहे. 1 जुलै 2025 रोजी विधानसभा मतदार यादीत नाव असलेल्यांचा समावेश या यादीत करण्यात आला आहे.

**शाळा-भंडारा**

भंडारा जिल्ह्याच्या मोहाडी तालुक्यात कांद्री गावात असलेली 'जिल्हा परिषद डिजिटल पब्लिक स्कूल' काही महिन्यांपूर्वी बंद पडण्याच्या उंबरठ्यावर होती. मात्र, मुख्याध्यापक नरेंद्र चौधरी यांच्या कार्यकुशलतेने आणि लोकसहभागातून ही शाळा नव्या रूपात उभी राहिली आहे, ऐकुया या शाळेच्या पुनरुज्जीवनाबद्दल मुख्याध्यापक नरेंद्र चौधरी यांच्याकडून....

**मागील वर्षी बंद होण्याच्या उंबरठ्यावर आलेली आमची शाळा त्यावेळी भौतिक सुविधांचा अभाव विद्यार्थ्यांची खूपच कमी झालेली संख्या अशा परिस्थितीत आम्ही रुजू झालो आणि एक नियोजनबद्ध कार्यक्रम आखून आणि त्यानुसार कार्य करून शाळेत भौतिक सुविधा निर्माण केल्या पिण्याच्या पाण्याची सोय असेल स्वच्छतागृहांची सोय असेल ब्लॅकबोर्डच्या ठिकाणी व्हाईटबोर्ड आणलेत शाळा डिजिटल केली प्रोजेक्टरचा वर्ग तयार केला स्मार्ट टीव्हीचा वर्ग तयार केला वाचनालय स्वतंत्र केलं कम्प्युटर लॅब स्वतंत्र उभी केली इंडोर गेम्स सुरू केले आणि हे सगळं केल्यामुळं आणि लोकांचा विश्वास संपादन केल्यामुळं आज आमच्या शाळेची पटसंख्या शंभर सहा आहे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी दिली त्यानुसार पालक सुद्धा खुश आहेत आणि समोर ही पटसंख्या पुढील वर्षी दोनशे पर्यंत जाईल आणि आमच्या शाळेत दोन स्मार्ट बोर्ड तीन प्रोजेक्टर आणि स्मार्ट टीव्हीत प्रत्येक वर्गात राहील एवढं नियोजन सुरू आहे.**

**गंजिफा-सिंधुदुर्ग**

16व्या शतकात भारतात उदयास आलेली गंजिफा कला सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडीमध्ये अजूनही जतन केली जात आहे. या प्राचीन कलापरंपरेवर भारतीय टपाल विभागानं विशेष टपाल तिकिट आणि टपाल कार्ड प्रसिद्ध केलं आहे. काल झालेल्या जागतिक टपाल दिनाचं औचित्य साधून बुधवारी मुंबईत देशाच्या इतिहासात प्रथमच गोलाकार स्वरूपातल टपाल कार्ड प्रसिद्ध करण्यात आलं. ऐकुया, गंजिफाविषयी ही रंजक माहिती....

**साडेचारशे वर्षांची परंपरा असलेली सावंतवाडीची गंजिफा कला ही सावंतवाडी राजघराण्यान या सांस्कृतिक वारशाच जतन करण्यासाठी पुनरुज्जीवित केली. गंजिफा हा राजदरबारात खेळला जाणारा एक लोकप्रिय रंगवलेल्या पत्त्यांचा खेळ होता. या पत्त्यांवर पूर्ण कथांच्या अनुषंगानं काही चित्र हातान रंगवलेली असतात. सावंतवाडीच्या गंजिफा कलाप्रकारात दशावतारसारख्या पौराणिक दृश्यांचा समावेश असतो. पोस्ट तिकिटावर हीच गंजिफा कला आता आपल्याला दिसणार आहे. 20व्या शतकाच्या शेवटी ही कला नामशेष होण्याच्या मार्गावर होती. पण सावंतवाडीच्या राजघराण्यातल्या राजमाता सत्वशीला देवींनी हि कला पुनर्जीवित केली. अनेक कलाकारांना त्याच प्रशिक्षण दिल त्यामुळे आज त्या कलेचं जतन होत आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी सिंधुदुर्गहून निलेश जोशी**

**ATS**

पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात दहशतवाद विरोधी पथकानं बुधवार रात्रीपासून मोठी कारवाई करत छापे टाकले. कोंढवा, खडकी, वानवडी यासह शहरातल्या 25 ठिकाणी संशयित व्यक्तींच्या घरांवर आणि कार्यालयावर छापे टाकण्यात आले, यावेळी काही आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आलं. 2023मध्ये ताब्यात घेतलेल्या आरोपींच्या चौकशीमधून मिळालेल्या माहितीनुसार ही कारवाई केली जात असल्याचं एटीएस कडून सांगण्यात आलं.

**संप-गडचिरोली**

आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी महावितरणमधील सात वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीनं 9 ते 11 ऑक्टोबरपर्यंत संप पुकारला आहे. संपाचा फटका काही ठिकाणी बसला असला, तरी या दरम्यान वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सज्ज असल्याचं महावितरणकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. वीज ही अत्यावश्यक सेवा असल्यानं नागरिकांची कोणताही गैरसोय होऊ नये यासाठी राज्य शासनानं मेस्मा लागू केला असून हा संप बेकायदेशीर ठरवला आहे.

**ई-बस-पास**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळानं ई-बस प्रवाशांसाठी मासिक आणि त्रैमासिक पास उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली आहे. ई-बस प्रकल्पातल्या 448 आणि शिवाई प्रकल्पातल्या 50 ई-बसेससाठी ही योजना आहे. ई-शिवनेरीसाठी मात्र ही योजना नाही.

**मॅरेथॉन**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त दोन नोव्हेंबर रोजी पुण्यात 'रन फॉर युनिटी' या महा मॅरेथॉन स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे, अशी माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. या स्पर्धेसाठी विविध राज्यातून तसंच केनिया, इथिओपिया या देशातले एकंदर 20 हजार धावपटू सहभागी होणार आहेत.

**क्रिकेट-महिला विश्वचषक**

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल विशाखापटणम मध्ये झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिका संघाने भारताचा 3 खेळाडू राखून पराभव केला. भारतानं प्रथम फलंदाजी करत दक्षिण आफ्रिके समोर 252 धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. दक्षिण आफ्रिकेनं 48 व्या षटकात हे आव्हान पार केलं.

**पुरुष क्रिकेट**

भारत आणि वेस्ट इंडिज पुरुष क्रिकेट संघांदरम्यानचा दुसरा आणि मालिकेतील अंतिम कसोटी सामना आजपासून नवी दिल्लीतील अरुण जेटली मैदानावर सुरू होणार आहे. या आधीचा सामना भारताने जिंकला असून हा सामना जिंकून मालिका जिंकण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. या काळात मराठवाड्यात हवामान कोरडं राहील.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**